# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (८)] —**

(१) **श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूरात १५ वर्षापूर्वी मिहान प्रकल्प सुरू करण्यात आला याचे मार्केटिंग देश विदेशात करण्यात येणे, याप्रकल्पामुळे राज्यातील बेरोजगारीचा मोठा प्रश्न सुटणार असल्याने सर्वांचे लक्ष याकडे लागलेले असणे, मिहान मध्ये इन्फोसिस, टीसीएस, सत्यम, बोईंग, हाल, शापुरजी-पालोनजी, विप्रो, डीएलएफ, अंबुजा, रीयल्टी, ताजसेट इंडस्ट्रीज, मॅक्सस्पेस अशा कंपन्यांनी आपल्या गरजेनुसार जमिनी घेतल्या पण १० वर्षापर्यंत त्यांनी जमिनीचा कोणताही उपयोग न करणे, फक्त १५ कंपन्यांनी काम सुरू करणे, इंटरनॅशनल कालबरेटिव्ह एअरोस्पेस डेव्हलपमेंटच्या माध्यमातून नॅनोसॅटेलाईट निर्मिती मिहानमध्ये सुरू करण्यास उत्सूक असणे, त्यासाठी कंपनीने एमआयडीसी सोबत सामंजस्य करार करणे, ५० एकर जागेवर ३०० कोटी रूपयांच्या गुंतवणूकीचा प्रकल्प बारगळला जाणे,करारानंतर कंपनी व अधिकाऱ्यांशी कुठलाही ताळमेळ न झाल्याने जवळपास ५०० चा रोजगार पुर्णपणे बारगळणे, सनटेक रिॲलिटी कंपनीने मिहानमध्ये १०८ एकरसाठी एमआयडीसी सोबत करार करणे, १५०० कोटी रूपयांच्या गुंतवणूकीची कंपनीची योजना असणे परंतु १०८ एकर जागा घेण्यासाठी हप्त्याची सोय, एमआयडीसी नियमामध्ये टप्याटप्याने जागा देण्याची कुठलीही तरतुद नसल्यानेही गुंतवणूक जवळपास बारगळली असणे, यामुळे देखील २००० लोकांना रोजगार न मिळणे, मिहानमध्ये अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, चीन, इंडोनेशिया, बेलारुस, डेन्मार्कच्या प्रतिनिधींनी व शिष्टमंडळांनी भेटी देणे, परंतु मिहानमध्ये गुंतवणूकी संदर्भात कोणीही सकारात्मक भुमिका स्पष्ट केली नसल्यामुळे स्थानिक बेरोजगारांमध्ये शासनाच्या प्रती निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक येथे मुंबई-आग्रा महामार्गावर दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास धुळयाहून येणाऱ्या तीन मोटारीमधून तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयांच्या जुन्या चलनातील बनावट नोटा तसेच लाखो रुपयांच्या जुन्या चलनातील खऱ्या नोटा पोलिसांनी जप्त करणे, या बनावट नोटांचे प्रकरणी संशयितांमध्ये एका मोठ्या राजकीय नेत्याचे समर्थक, श्री.छबु नागरे यांस अटक करण्यांत येणे, बनावट नोटा प्रकरणामुळे नाशिक जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडणे, या बनावट नोटाप्रकरणी श्री.नागरे यांचेसह ११ जणांना शहर पोलिसांनी अटक करणे, बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर याप्रकरणाचे धागेदोरे पुणे, सिन्नर, मुंबई, ठाणे, नवी मुंबईपर्यंत व्यापक स्वरुपात पसरलेले असल्याचे पोलिस कारवाईत समजून येणे, या टोळीविरुध्द आडगांव पोलिस ठाणे, नाशिक येथे देशद्रोहाचा गुन्हा दाखल होणे, पोलिसांनी तपासादरम्यान बनावट नोटा छापण्याचे साहित्य हस्तगत करणे, या गंभीर गुन्ह्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्याने याप्रकरणी उच्चस्तरीय यंत्रणेमार्फत सखोल व कठोर चौकशी व्हावी, अशी जनतेकडून मागणी केली जाणे, बनावट नोटा छापल्याप्रकरणी अटकेत असलेल्या श्री.नागरे यांच्या पत्नीवर दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथील भद्रकाली पोलिस स्टेशन येथे खंडणीचा गुन्हा दाखल केला जाणे, बनावट नोटा व छपाईची सामग्री पोलिसांच्या हाती लागल्याने बनावटगिरीच्या टोळीचा हा धंदा जुनाच असल्याचा संशय व्यक्त केला जाणे, या टोळीच्या पर्दाफाशनंतर याचे लोण कुठपर्यंत पोहोचले आहे, याचा पोलिसांनी सखोल छडा लावावा, अशी मागणी जनतेकडून केली जाणे, बनावट नोटांचा पुरवठा केव्हा व कोणकोणास करण्यात आला, याचा शोध घेण्यात यावा, अशीही जनतेकडून आग्रही मागणी केली जाणे, शासनाने एकंदरीत प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेऊन सी.बी.आय.मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय तात्काळ घ्यावा, असाही सर्वसामान्य जनतेत आग्रह असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **ॲड. अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे चिकणघर येथील आरक्षण क्र. १९२, १९३, १९४, १९५, १९६, १९७ या भूखडांवर बेकायदेशीरपणे केलेले अतिक्रमण निष्कासित न करताच टिडीआर मंजूर करुन दोषी कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त, श्री रामनाथ सोनवणे व इतर यांनी शासनाची फसवणूक करुन क.डों.म.पा. मध्ये टिडीआर घोटाळा केल्यामुळे या संपूर्ण प्रकरणामध्ये अनियमितता सिध्द झालेली असल्याने आजमितीपर्यंत

मंजूर केलेला ६ लाख ७० हजार फुटांचा टिडीआर विनाविलंब रद्द करुन दोषींवर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, सदर प्रकरणी महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री.रामनाथ सोनवणे, तत्कालिन सहायक संचालक नगररचना श्री.चं.प्र.सिंह, तत्कालिन नगररचनाकार श्री. रघुवीर शेळके, कनिष्ठ अभियंता, श्री.शशीम केदार यांची सद्य:स्थितीत सुरु असलेली विभागीय चौकशी, सदर चौकशीतील मुख्य साक्षीदार श्री. नो.र.शेंडे तत्कालिन उपसंचालक नगररचना, कोकण विभाग व विद्यमान संचालक नगररचना, पुणे यांनी संपूर्ण कागदपत्रांची पुर्तता महानगरपालिकेकडून करण्यात न आल्याबाबत दिलेली साक्ष, यावरुन महानगरपालिकेकडूनच जाणीवपूर्वक चौकशीस विलंब करण्यात येत असणे, सदर विलंबामुळे दोषींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत सर्वसामान्यामध्ये निर्माण झालेली संभ्रमाची भावना, श्री.शेंडे तत्कालिन उपसंचालक, नगररचना कोकण विभाग या पदावर असताना त्यांनी शासनाला जो अहवाल दिला तो अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे दिलेला असणे, त्यामुळे श्री.जितेंद्र भोपळे, तत्कालिन सहा.संचालक, नगररचना, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व श्री.नो.र.शेंडे तत्कालिन संचालक, नगररचना, कोकण विभाग यांनी महाराष्ट्र शासनाला पाठविलेल्या अहवालावरच निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, सदर प्रकरणी संपूर्ण चौकशी निवृत्त न्यायाधीश यांच्यामार्फत पुनःश्च करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. जयंत पाटील,** धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ऊर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील साखर कारखान्यांना मूलभूत सुविधा संमती (इन्फ्रास्ट्रक्चर क्लीअरन्स) प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी (एम.एस.सी.डी.सी.एल.) बरोबर वीज खरेदी करार (पॉवर परचेस् ॲग्रिमेंट) करण्यास अडचण येणे, पॉवर परचेस् ॲग्रिमेंट किमान २ हजार मेगा वॅटसाठी संमती मिळणे आवश्यक असणे, ज्या कारखान्याकडे सहवीज निर्मिती प्रकल्प आहेत त्या कारखान्यांना शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, परंतु ज्या कारखान्यांकडे सहवीज निर्मिती प्रकल्प नाहीत अशा कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे ते साखर कारखाने आर्थिक संकटात सापडणे, ज्या कारखान्यांकडे सहवीज

निर्मिती प्रकल्प नाहीत त्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पात समाविष्ट करून घेतल्यास त्यांच्यावर येणारे आर्थिक संकट दूर होऊन त्या साखर कारखान्यांना, शेतकऱ्यांना एफ.आर.पी. देणे सोईस्कर होणे, यासाठी अडचणीत असलेल्या साखर कारखान्यांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना वा केलेली कार्यवाही."

(५) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यभरात अनेक ठिकाणी महापुरुष आणि गड किल्यांच्या नावांचा वापर बिअरबार परमीट रुम, मांसाहारी खानावळ, लोकनाट्य कला केंद्र तसेच देशी दारु विक्री केंद्रांना करण्यात येणे, अनेक ठिकाणी देव-देवतांच्या नावाचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, अनेक महापुरुषांच्या नावाचाही वापर अशा ठिकाणी होत असणे, शासनाने यापुर्वी देव-देवतांच्या नावाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध करणे, तरीही अनेक ठिकाणी सर्रास महापुरुषांसह देव-देवतांच्या नावांचे फलक लावुन त्यांचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, दारु विक्री केंद्र व बिअरबार सारख्या हॉटेलांना महापुरुष व देव-देवतांची नावे दिल्यामुळे त्यांच्या नावाची विटंबना होत असणे, समाजासाठी जे महापुरुष आदर्श आहेत अशा महापुरुषांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला देतांना गैरठिकाणी नावाचा वापर होत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या भावना मोठ्या प्रमाणावर दुखावणे, व्यसनाधिनतेकडे आणि गैरमार्गाकडे घेऊन जाणाऱ्या व्यवसायाला आदर्श व्यक्ती आणि देव-देवतांची नावे देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध करुन अशा नावांचे फलक तातडीने काढून टाकण्यासाठी शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. नारायण राणे,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग, सावंतवाडी भागात माकडतापाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये या तापाने दोघांचा झालेला मृत्यू व आतापर्यंत जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त रुग्ण माकडतापाने ग्रस्त असल्याचे आढळून येणे, या तापाच्या नियंत्रणासाठी प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये व पर्यटकांमध्ये पसरलेले तीव्र भीतीचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. रामहरी रुपनवर,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"ता.माळशिरस, जि.सोलापूर, येथील पुणे-पंढरपूर हा राज्यातील महत्त्वाचा मार्ग असून सध्या हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून केंद्र शासनाकडे वर्ग झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर महामार्गापर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना ये-जा करण्यासाठी रस्त्याची सुविधा आवश्यक असणे, परंतु तालुका माळशिरस, जि.सोलापूर येथील मुख्य हायवेला जोडणारे एम.डी.आर. अंतर्गत तयार करण्यात आलेले रस्ते सद्यस्थितीत अतिशय खराब झाले असून हे रस्ते मागील अनेक वर्षापासून दुरुस्त करण्यात आले नसल्याने नागरीकांना प्रवास करणे अत्यंत गैरसोयीचे होत असणे, तसेच रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यांवर मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होऊन अनेकदा या रस्त्यांवर लहान मोठे अपघात होऊन त्यात जिवीत व वित्त हानी होत असल्याचे आढळून येणे, यामुळे ग्रामस्थ व प्रवासी यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची व चिडीची भावना लक्षात घेता त्वरीत या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. मितेश भांगडिया,** प्रा. अनिल सोले, श्री. नागोराव गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील ११ अकृषक विद्यापीठांमध्ये सर्व स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमाकरिता सत्र पद्धत (semister pattern) सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येते, सत्र परीक्षा पद्धती अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांवर त्याच सोबत महाविद्यालय व विद्यापीठांवर देखील परीक्षेचा बोजा वाढणे, सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांचा संपूर्ण अभ्यासक्रम एका विशिष्ट वेळेत पूर्ण होण्याचे बंधन असणे, मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये मंजूर प्राध्यापकांची बहुतांश पदे रिक्त असणे तसेच या पदावर अंशकालीन शिक्षक / प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकवत असणे, अंशकालीन शिक्षक / प्राध्यापक असल्यामुळे त्यांना अभ्यासक्रम निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन नसणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यांना सेल्फ स्टडी करावी लागणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातून पुरातन असलेली अमुल्य नाणी गहाळ झाल्या प्रकरणाची अजूनही चौकशी सुरूच असणे, अत्यंत पुरातन व मौल्यवान नाणी विद्यापीठातून गायब झाल्यामुळे विद्यार्थी विद्यापीठातील अंतर्गत सुरक्षेबाबत साशंक असणे, विद्यार्थ्यांच्या मनात स्वत:च्या शैक्षणिक कागदपत्रांबद्दल असुरक्षितता निर्माण होणे, विद्यार्थ्यांचे

शैक्षणिक हित जपण्याची नितांत आवश्यकता, सत्र परीक्षा पद्धती त्वरित बंद करून एक परीक्षा घेण्याकरिता प्रभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. संजय दत्त,** धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री. अनिल भोसले, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई-पुणे एक्सप्रेस वरील टोल बंद करण्याची मागणी होत असताना येत्या एप्रिल, २०१७ महिन्यापासून एक्सप्रेस वेवर १८ टक्के वाढ करण्यात येऊन कारचालकांना ३५ रुपये जास्त द्यावे लागणार असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना टोलमध्ये ३५ रुपये, तर महामार्गावर १६ रुपयांची वाढ होणार असणे. राज्य परिवहन मंडळाच्या सर्व बसेस तसेच शिवनेरींना टोलमध्ये सवलत असल्याचे उघडकीस आल्यानंतरही सदर बाब दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊनही अद्यापी याबाबत परिवहन मंत्री यांनी संबंधीत आयआरबी कंपनीकडे त्यांनी बेकायदेशीरपणे वसुल केलेल्या २० कोटी रुपयांच्या रकमेची व्याजासह परत करण्याची मागणी न करणे, सरकारची टोलबाबतची भूमिका बदलेली असून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लूट सूरु असणे, सदर रस्ता राज्य सरकारच्या मालकीचा असून ९१८ कोटी रुपये अपफ्रंट स्वीकारुन रस्ते विकास महामंडळाने १५ वर्षे (ऑगस्ट-२०१९ पर्यंत ) टोल स्वीकारण्याचे कंत्राट आयडियल रोड बिल्डर्सला (आयआरबी) दिले जाणे, टोलपोटी ठेकेदारास २८६९ कोटी मिळण्याची अपेक्षा धरण्यात येणे, प्रत्यक्षात या ठेकेदाराने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६ रोजीपर्यंत २८७६ कोटी रुपये वसूल केलेले असणे, त्यामुळे सदर द्रुतगती महामार्ग टोलमुक्त करावा अशी मागणी काही सामाजिक कार्यकत्यांनी मा.मुख्यमंत्री , मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी पत्राने केली असल्याचे दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, ही रक्कम नोव्हेंबरमध्येच ठेकेदारास मिळाली असून आताही महिन्याला सुमारे ४० कोटी रुपये टोलच्या माध्यमातून सन २०१९ पर्यंत मिळणार असणे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कंत्राटदाराने ऑगस्ट, २०१९ पर्यंत जमा करायच्या रक्कमेपेक्षा अधिक रक्कम डिसेंबर, २०१६ मध्येच वसूल केली असल्याचे उजेडात येणे, राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव यांच्या समितीने दिलेल्या अहवालातही टोलवसुली झाली असल्याचे तसेच ती रद्द

करण्याबाबत शासनाला सुचविण्यात येणे, टोलवसुली मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर बेकायदेशीरपणे सुरु असणे, द्रुतगतीमहामार्गावरील टोलवसूलीचे लक्ष्य पूर्ण झाले असतानाही शासनाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावारील टोल २३० रुपये पर्यंत दर वाढविण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण होणे, टोलमधून अपेक्षेपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याने करारात दिलेले लक्ष मुदतीआधीच पूर्ण झाले असतानाही टोल दरात वाढ करण्याचा निर्णय हा लोकांची फसवणूक करण्याचा असणे, टोलच्या माध्यमातून नागरिकांची होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बेकायदा होत असलेली टोल रद्द करण्यासाठी तसेच वाढविण्यात असलेले टोल दर रद्द करण्यासाठी तातडीने करावाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया".

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये विधी व न्याय विभागाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर व सामान्य प्रशासन, नगरविकास आणि गृह विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च,

२०१५ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये महसूल व वन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(३) **वित्त मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये वित्त विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(४) **शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा आणि अल्पसंख्याक विकास मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा आणि मराठी भाषा या विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे

आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन २०१०-२०११, सन २०११-२०१२ व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि सन २०१०-२०११ व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनावरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अल्पसंख्याक विकास विभागाचा सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) गृहनिर्माण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृहनिर्माण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर

ठेवतील.

(६) **ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये ग्रामविकास व जलसंधारण आणि महिला व बाल विकास विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(७) **अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण व संसदीय कार्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर आणि संसदीय कार्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(८) **वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** :

**(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचा सन २०१०-२०११ व सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित

महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये जलसंपदा विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "मा. राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१७-२०१८ च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील" सभागृहासमोर ठेवतील.

**(९) उद्योग, खनिकर्म मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "मॉयल लिमिटेड यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(१०) कृषि, फलोत्पादन मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित

महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये कृषि, फलोत्पादन विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(११) पर्यावरण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पर्यावरण विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(१२) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** : **(क)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७ प्रसिध्द करणारी

अधिसूचना क्रमांक मविनिआ / लिगल / २०१७ / ०१२८९ दिनांकित ४ जानेवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी / आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / तांत्रिक / परवाना अटी / जीईपीएल / २०१७ / १४२५, दिनांकित ३ फेब्रुवारी, २०१७ सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(१३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर आणि सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील

सभागृहासमोर ठेवतील.

**(१४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(१५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(१६) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(१७) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर

योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवणे.**

(१) **श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** : **(क)** "राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील देवस्थान इनामाच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "ग्रामपंचायत भोयर पंचायत समिती यवतमाळ येथे पाण्याची टाकी आणि विहीर मंजूर करुन मिळणेबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

(२) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** : "कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची स्वतंत्र नगरपरिषद होण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — (असल्यास).**

**पाच : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**सहा : (गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात**

**दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) -**

**सर्वश्री.जयवंतराव जाधव,** हेमंत टकले, अब्दुल्लाखान दुर्राणी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा — (३० मिनिटे) —**

"दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी नगरसूल (ता.येवला जि.नाशिक) येथे कांद्याला भाव मिळत नसल्यामुळे एका शेतकऱ्याने पाच एकर उभ्या कांदा पिकाला आग लावून शेत पेटवून देणे, कांद्याला सरासरी दोन ते तीन रुपये भाव मिळत असल्यामुळे उत्पादन खर्चही मिळणे दुरापास्त होणे, माहे जुलै व ऑगस्ट, २०१६ मध्ये विकलेल्या कांद्याला प्रति क्विंटल एक रुपयाचे जाहीर केलेले अनुदान अद्यापही शेतकऱ्यांच्या हाती न पडल्यामुळे शासनाने बाजार हस्तक्षेप योजनेद्वारे भाव स्थिरीकरण निधीतून कांद्याची खरेदी करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, दिनांक ५ जुलै, २०१६ रोजीपासून कांदा या पिकाचा जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समावेश नसल्याने कांद्याच्या एकूण उत्पन्नापैकी देशांतर्गत गरज लक्षात घेवून निर्यातीबाबत शीघ्र गतीने उपाययोजना करण्याची तसेच निर्यातीला प्रोत्साहन आणि कांदा वाहतुकीसाठी पुरेशा रेल्वे वॅगन्स उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांना उत्पादनखर्चापेक्षा कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांकडून हमीभावाने कांदा व इतर शेतमाल खरेदी करण्याची गरज, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला कमालीचा संताप, यावर्षी पावसाने साथ दिल्यामुळे कांदा, तूर, टॉमेटो इत्यादी शेतमालाचे विक्रमी उत्पादन होणे, अनेक शासकीय खरेदी केंद्रांवर १५ दिवसांपासून रांगा लागल्याने शेतकऱ्यांचे होणारे प्रचंड हाल, शेतकऱ्यांना वेठीस धरल्यामुळे तसेच उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळणारा भाव यातील तफावतीमुळे शेतकरी हैराण होणे, राज्यातील शेतकरी कर्जबाजारी होऊनही केंद्र शासनाकडून पीक कर्जावरील २ महिन्याचेच व्याज माफ केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे निर्माण झालेले वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## - मध्यंतर -

**सात : सभागृह नेत्यांचा प्रस्ताव -**

"सन्माननीय पद्मविभुषण श्री.शरदचंद्रजी पवार, खासदार, माजी

"भारताच्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिराजी

| | |
|---|---|
| मुख्यमंत्री व माजी केंद्रिय मंत्री" यांच्या संसदीय कारकिर्दीस ५० वर्ष झाल्याबद्दल. | गांधी" यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त. |

"महाराष्ट्र विधानसभेतील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य माजी मंत्री व माजी विरोधी पक्ष नेता श्री.गणपतराव देशमुख" यांच्या संसदीय कारकिर्दीस ५५ वर्ष झाल्याबद्दल.

**त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलच्या प्रस्तावावर चर्चा.**

**आठ : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे वि.स.वि.क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.नारायण राणे, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

(२) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

(३) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(४) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) ग्रामविकास मंत्री
(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.
(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.
(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.
(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(९) श्री.अनिल परब, वि.प.स.    (१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

---

(५) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री जयंत पाटील, बाळाराम पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री    (२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.
(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद    (४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.
(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.    (६) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.    (८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(९) श्री.अनिल परब, वि.प.स.    (१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

---

(६) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(७) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(८) **"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६"**

(९) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(१०) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

(११) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ — शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

(१२) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(१३) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ — सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७"**

-----------------------------------------------------------------------------------

**नऊ : (गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — [अनुक्रमांक — (क) ते (घ)] —**

**(क) श्री.सुजितसिंह ठाकूर,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पीक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले

धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, जनार्दन चांदुरकर, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, अनिल तटकरे, आनंदराव पाटील, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयदेव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षात ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून आत्महत्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले, यावर्षी तूरीचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तूरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तूर खरेदी करण्याचा निर्णय घेणे, मात्र तूर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तूर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तूर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीची वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तूर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन

उत्पादक शेतकरीसुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेतीमालाला बोनस देण्याचे धोरण स्वीकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ग)** **सर्वश्री शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरसिंह पंडित, जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.विक्रम काळे, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री.नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"राज्यात झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, शहरीकरण वाढत असताना त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका यांच्यावर पडत असलेला ताण, नविन शहरीकरण होत असल्यामुळे त्याठिकाणी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणीपुरवठा करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्था असमर्थ असणे, शहरीकरण वाढत असले तरी महानगरपालिकांना राज्य शासन पुरेसा निधी देत नसणे, त्यातच एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिका व राज्य शासन आर्थिक अडचणीत असणे, यापूर्वी केंद्रातील युपीए शासनाने शहरी विकासासाठी अनेक आणलेल्या योजना राज्यशासनाने बंद करणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरोत्थान योजना बंद करुन स्मार्ट सिटी योजना आणणे, परंतु त्यासाठी निधींची भरीव तरतूद नसणे, तसेच अद्यापही स्मार्ट सिटीबाबतचे प्रकल्प अहवाल तयार नसणे, नागरी क्षेत्रात पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस उग्ररुप धारण करीत असणे, मुंबईतील ४ लाख

झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही याबाबत झोपडपट्टीधारकांना घरे उपलब्ध करुन न देणे, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधलेल्या ३५ हजार सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र न मिळणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटई क्षेत्र मिळविण्यासाठी विकासक या योजनेचा वापर करुन घेत असणे, ठाणे, जिल्ह्यातील ७ महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, नागपूर शहरातील सिव्हील लाईनचा परिसर वगळता अन्य भागात असलेले खराब रस्ते व पायाभूत सुविधांचा अभाव, पुणे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी, पार्कींगची समस्या, मेट्रो सुरू करण्याची केलेली घोषणा, काही प्रमुख भागात जनतेच्या मागणीनुसार रस्ता रुंदी रद्द न करणे, जुन्या वाड्यांचा पुनर्विकासाचा प्रलंबित असलेला प्रश्न, राज्य शासनाने पुणे शहरातील मेट्रोलगत जाहिर केलेल्या वाढीव चटई क्षेत्राचे होणारे दुरगामी दुष्परिणाम, डंम्पिग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या, औरंगाबाद शहरासाठी करावयाची समान्तर जलवाहिनी योजना कार्यान्वित न होणे, नारेगाव कचरा डेपोचा प्रलंबित प्रश्न, औरंगाबाद शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था व महापालिकेत नव्याने समाविष्ठ केलेल्या गावांचा निधीअभावी विकास न होणे, राज्यातील पर्यटन क्षेत्रात साईन बोर्ड नसल्यामुळे पर्यटकांना होणारा त्रास, एकूणच राज्यातील नागरी क्षेत्रात सर्वच पायाभूत सुविधांचा अभाव असताना राज्य शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शहराच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यास होत असलेली दिरंगाई, त्यामुळे नागरीभागात विकासाचा उडालेला बोजवारा, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(घ) **सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** -

"सर्वसामान्यांना मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाच्या बदल्यात विकासकाने म्हाडाला अधिमुल्याऐवजी गृहसाठा द्यावा अशी दुरुस्ती करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्या नविन गृहनिर्माण धोरणात विकासकाकडून गृहसाठ्याऐवजी पैसे घेण्याची तरतूद करण्यात येणे, शासकीय जमिनीवरील झोपड्यांना एस.आर.ए.

अंतर्गत भाडेपट्टा उपलब्ध करुन जागा मालकी तत्वावर देणे, संक्रमण शिबिरात अनधिकृत घुसखोरी केलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना रेडी रेकनर दरानुसार किंवा पंतप्रधान आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात येणे, एफ.एस.आय.ची खैरात वाटून पायाभूत सुविधेवरील ताण वाढणे, विकासकाकडून विनामुल्य प्राप्त होणाऱ्या पाच हजार सदनिका अद्याप म्हाडाला प्राप्त झालेल्या नसणे, शासनाचे गृहनिर्माण धोरण बिल्डरांच्या सभेत विभागाला थांगपत्ता लागू न देता जाहीर करण्यात येणे, स्थावर मालमत्ता कायद्याच्या अंमलबजावणी करीता होत असलेला विलंब, तसेच राज्यातील निवासी डॉक्टरांवर सातत्याने हल्ले होणे, त्यात डॉक्टरांना गंभीर इजा पोहचणे, वाढत्या हल्ल्यांमुळे डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, सुरक्षेच्या मागण्यांसाठी राज्यातील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलनाच्या माध्यमातून संप सुरू करणे, संपामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प होणे, उपचाराअभावी रुग्णांचे अतोनात हाल होणे, गंभीर आजारी रुग्णांना प्राण गमवावे लागणे, मा. उच्च न्यायालयानेही संपाची गंभीर दखल घेऊन रुजू न होणाऱ्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याचा इशारा देणे, मा.न्यायालयाच्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर "मार्ड" ने संपापासून स्वत:ला वेगळे करणे, न्यायालयाच्या आदेशानंतर, तसेच प्रशासनाने नोटीस बजावूनही डॉक्टर रुजू न होणे, यामुळे राज्यातील रुग्णांच्या जिविताला धोका निर्माण होणे, निवासी डॉक्टरांच्या संपावर तातडीने तोडगा काढून कायमस्वरुपी, परिणामकारक तोडगा शोधणे आवश्यक असणे, तसेच म्हैसाळ (जि.सांगली) येथेही डॉ.खिद्रापुरे यांच्या क्लिनिकमध्ये अनेक गर्भपात केलेले असणे, गर्भलिंग निदान करुन स्त्री-भ्रूणाची हत्या करणे, गर्भपातासाठी मिसोप्राससारख्या गोळ्या वापरलेल्या असणे, ही औषधे मुंबईतून अवैधरित्या दलालाकडून खरेदी केलेली असणे, या गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेकजणांचा सहभाग असल्याचे उघडकीस येणे, याप्रकरणी जलदगतीने तपास करणे आवश्यक असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्यातील डॉक्टरांना संरक्षणाबरोबरच रुग्णांनाही रुग्णसेवा देणे गरजेचे असणे, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक असणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील झोपडी धारकांना दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे शहराच्या पूर्व भागासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी ३८० कोटी १६ लाख रुपये खर्चाची भामा-आसखेड योजना राबविण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, उक्त योजनेच्या कामास माहे जानेवारी,

२०१४ मध्ये सुरुवात झाली असूनही अद्यापी काम पूर्ण झालेले नसणे, केंद्र शासनाने सुमारे तीन वर्षापूर्वी जेएनएनयूआरएम योजनेंतर्गत २५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असून त्यापैकी रुपये १०६ कोटी एवढा निधी पुणे महानगरपालिकेकडे दिलेला असणे, काम लवकर पूर्ण न झाल्यास उर्वरित निधी मिळण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता, पाणी पुरवठयाचा प्रश्न गंभीर असून उक्त योजना लवकरात लवकर पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.विक्रम काळे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात मागासवर्गीयांकरिता शैक्षणिक प्रवेशासाठी व शासकीय-निमशासकीय नोकऱ्यांसाठी आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास अनेक अडचणी येत असणे, त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती रोखल्या जात असणे, जात पडताळणी समितीकडे लाखो अर्ज वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, नियमित अर्ज करुनही वेळेत प्रमाणपत्र न मिळणे, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती सुलभ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २७ मार्च, २०१७.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**